आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ८५ वा ● रविवार दि. २१ सप्टेंबर २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा दौरा कार्यक्रम

लातूर, : राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे रविवार, २१ सप्टेंबर २०२५ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

सहकार मंत्री श्री. पाटील हे सकाळी १० वाजता शिरूर ताजबंद येथून चाकूर तालुक्यातील हाळी (खुर्दळी) कडे प्रयाण करतील. सकाळी १०.३० वाजता हाळी (खुर्दळी) येथील श्री जनमाता आई देवस्थान येथे घटस्थापना कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. सकाळी ११ वाजता हाळी (खुर्दळी) येथून अहमदपूरकडे प्रयाण करतील. सकाळी ११.३० वाजता अहमदपूर येथील दीपवर्षा मंगल कार्यालय येथे १०० टक्के वसुली दिलेल्या विविध कार्यकारी सेवा संस्थांचे चेअरमन व गट सचिव यांचा सत्कार कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. दुपारी १ वाजता अहमदपूर येथील जवळगा रोडवरील किलबिल नॅशनल स्कूल येथे अहमदपूर रोटरी क्लब यांच्यावतीने आयोजित उपक्रमशील शिक्षकांचा गौरव कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार टेंभूर्णी येथे विविध कार्यकारी सेवा सोसायटी टेंभूर्णी–हसरणी वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहतील. त्यानंतर शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवास येथे राखीव. रात्री ९ वाजता शिरूर ताजबंद येथून लातूरकडे व रात्री १०.३० वाजता लातूर येथून मुंबईकडे प्रयाण करतील.

## शेताबद्दल खोटी तक्रार व शेतकऱ्यास जातिवाचक शिवीगाळ करुण मागितली खंडणी

भोकर – भोकर तालुक्यातील सोमठाणा शिवारातील सुधा प्रकल्पात गेलेल्या माझ्या वडिलोपार्जित शेतजमिनीचा मोबदला मिळू नये म्हणून खोटी तक्रार देऊन शेतकऱ्यास जातिवाचक शिवीगाळ करीत खंडणी मागितल्या प्रकरणी तिघांविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात ट्रॅासिटी, खंडणीसह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर वृत्त भोकर शहरातील रहिवासी चंद्रकांत आरकलवाड, सुरेश आरकलवाड, बालाजी आरकलवाड या शेतकऱ्यांची वडिलोपार्जित शेतजमीन तालुक्यातील सोमठाणा शिवारात गट क्रमांक ७५/३ मध्ये एकूण १ हेक्टर ३९ आर रोड लगत आहे ती शेतजमीन वडिलांनी आम्ही तीन भावांमध्ये न्यायालयातून तडजोडपत्रा आधारे २०१५ मध्ये वाटणी करून दिली व त्यानुसार आम्ही सातबारा उताऱ्यावर नोंद करून घेतली. तालुक्यातील सुधा प्रकल्पाची उंची वाढत असल्याने या प्रकल्पासाठी आमच्या तिघाही भावाची शेतजमीन शासनाने संपादित करून घेतली परंतु अंकुश जाधव, तानाजी भडके, पोशट्टी करेवाड रा. शिंगारवाडी ता. भोकर जि. नांदेड सिंगारवाडी येथील ह्या तिन्ही दुष्कर्म लोकांनी संगणमत करून आमचे वडील नारायण आरकलवाड यांना गट नंबर ७५/४ मधील शेत जमिनीचा मोबदला मिळू नये म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड,उपविभागीय अधिकारी भोकर कार्यालयात आक्षेप अर्ज दिला.

आमची वडीलोपार्जित असलेली शेतजमीन ही सोमठाणा शिवारातील गट क्रमांक ७५/३ मध्ये असताना या दुष्कर्म लोकांनी आमच्यासह प्रशासनाची दिशाभूल करून आमच्या शेतजमिनीचा मोबदला मिळण्यापासून आम्हाला वंचीत ठेवले . या लोकांनी एवढ्यावरच न थांबता तुमच्या विरुद्ध दिलेला आक्षेप अर्ज आम्ही माघार घेऊ,तुम्हाला कोटी रुपये आले आहेत त्यामधील आम्हाला दहा लाख रुपये द्या अशी मागणी आमच्यासह आमच्या नातेवाईकांकडे मागणी केली तेव्हा आमच्या गटाशी व आमच्या शेताची तुमचा कसलाही संबंध नसताना आम्ही तुम्हाला पैसै काय म्हणून द्यावे .. ? असे म्हणत असताना आम्हाला आमच्या नातेवाईकांसमोर जातीवाचक शिवीगाळ करुण अश्र्लील भाषेत शिवीगाळ केली व शासनाकडून येणाऱ्या पैशातून आम्हाला दहा लाख रुपये द्या नाहीतर तुम्हाला एक रुपयेसुद्धा मिळू देणार नाही म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली. यावरून शेतकरी चंद्रकांत आरकलवाड यांनी भोकर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अंकुश जाधव, तानाजी भडके, पोशट्टी करेवाड रा. शिंगारवाडी ता. भोकर जि. नांदेड या तिघा आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०८(३),२९६,३५१(२),३५१(३),३(५), ३(१)(r),३(१)(s)अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कायद्याअंतर्गत भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सधील गुन्ह्याचा अधिकचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डी आर हाके, पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. एवढ्या गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल होत असताना सदरील तिन आरोपी पैकी एक आरोपी भोकर पोलीस ठाण्यात हजर होता परंतू सदरील गुन्हा दाखल झाल्याचे माहीत होताच सोमठाणा बीटचे पोलीस कर्मचारी या आरोपीस पळून लावण्यासाठी मदत केल्याचे सदरील फिर्यादी कडून सांगण्यात येत आहे.

# लातूरचे खा.डॉ. शिवाजी काळगे यांना जात पडताळणीबाबत उच्च न्यायालयाने दिली शेवटची संधी : संजयभाऊ कांबळे

लातूर : लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांना जात पडताळणीबाबत उच्च न्यायालयात उपस्थित राहण्याबाबत अनेकदा नोटीस देऊनही त्यांनी आपल्या वकिलामार्फत अर्ज सादर करण्याशिवाय काहीही केलेले नाही. त्यामुळे उच्च न्यायालयाने आत त्यांना दि. ६ ऑक्टोबर २०२५ ही तारीख शेवटची संधी म्हणून आदेशित केले असल्याची माहिती भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी जात पडताळणी समिती, लातूर यांच्याकडून सन २०१९ ला ' माला जंगम' जातीचे प्रमाणपत्र पडताळून घेऊन २०२४ साली लोकसभा निवडणूक लढविली. त्यांनी प्रवेश निर्गम उतारा आणि खासरा पाहणी मधील मूळ रेकॉर्डमध्ये हेराफेरी करून प्रमाणपत्र पडताळून घेतले आहे, ते रद्द व्हावे या मागानीस्ताही औरंगाबाद उच्च न्यायालयात जुलै २०२४ मध्ये याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, जात पडताळणी समिती, लातूर आणि खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. उच्च न्यायालयाने डॉ. काळगे यांना न्यायालयात उपस्थित राहण्याबाबत नोटीस पाठविली असून त्यांनी अनेकवेळा हजर न राहण्याबाबत अर्ज सादर केला. दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी सुद्धा ते न्यायालयात हजर राहिले नाहीत. आपल्या वकिलामार्फत त्यांनी अर्ज सादर केला होता, असे सांगून संजयभाऊ म्हणाले की, खा. डॉ. काळगे यांच्या अर्जाबाबत आक्षेप घेताना आपल्या वकिलांनी खासदार हे न्यायालयापेक्षा मोठे नाहीत. ते जाणूनबुजून न्यायालयाचा वेळ घालवू पाहत असल्याचा युक्तिवाद केला. हा युक्तिवाद मान्य करून उच्च न्यायालयाने डॉ. काळगे यांना दोन हजार रुपये कॉस्ट वादीस ( आम्हास ) देण्याबाबतआणि पुढील महिन्यात ६ ऑक्टोबर २०२५ ही तारीख 'आपणास शेवटची संधी 'असल्याचे आदेशित केले आहे. तसेच दि. ६ ऑक्टोबर




रोजी सुनावणी होऊन न्यायालयाचा निकाल आमच्या बाजूने होईल अशी आआपणास खात्री असल्याचेही संजयभाऊ कांबळे यांनी यावेळी सांगितले. यापूर्वीही आपण जात पडताळणी समिती, लातूर यांना जात पडताळणी कायदा २००० कलम ७ (१) नुसार जात पडताळणी प्रमाणपत्र मागवून अथवा जप्त करून, तपासून रद्द करण्याचे त्यांना अधिकार असल्याने दि. १५ जुलै २०२५ रोजी लेखी अर्ज दाखल केला आहे. त्यावरही अद्याप कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याचे कांबळे यांनी सांगितले.

डॉ. शिवाजी काळगे यांचे शिक्षण झालेल्या अंकुलगा ( राणी ) येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रवेश निर्गम रजिस्टरमध्ये जातीच्या रकान्यामध्ये हेराफेरी केल्याची बाब संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणून देऊन कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत दि. १३ सप्टेंबर रोजी लेखी तक्रार दिल्याचेही कांबळे यांनी स्पष्ट केले. तसेच शिवाजीराव काळगे यांनी शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयातील खासरा पाहणीच्या अहवालात सुद्धा माला जंगम शब्द दुसऱ्या पेनने लिहून हेराफेरी केली असल्याने तहसीलदारांना तक्रार देण्यात आली आहे. तहसीलदार आणि शिक्षणाधिकारी याना कार्यवाही करण्याबाबत आदेशित करावे म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडेही दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी लेखी तक्रार देण्यात आल्याचे संजयभाऊ कांबळे यांनी सांगितले.

आपली ही लढाई सामाजिक न्यायाच्या हक्काबाबत आहे. खा. डॉ. काळगे यांच्याशिआप्ले व्यक्तिशः कोणतेही मतभेद नाहीत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणारआहेत. त्या निवडणुकीतही कोणाकडून बनावट जात पडताळणी प्रमाणपत्राच्या आधारावर निवडणूक लढविण्याचा प्रयत्न होऊ नये असेहीआपले प्रांजळ मत असल्याचे संजयभाऊ कांबळे यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश वाघमारे, हरिश्र्चंद्र वाघमारे, सतीश मादळे, नारायण गायकवाड, धम्मपाल सावंत, रुपेश गायकवाड, उत्तम कांबळे, राजू कांबळे, सत्यवान जोगदंड, कैलास क्षीरसागर, सुनील सरवदे, विशाल गायकवाड आदी उपस्थित होते.

## महसूल विभागाच्या सेवा पंधरवडा अंतर्गत लातूर तालुक्यात पाणंद रस्त्यांच्या क्रमांकन प्रक्रियेला सुरुवात

लातूर, : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ते महात्मा



गांधी गांधी यांची यांची जयंती अर्थात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' आयोजित केला आहे. या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात पाणंद आणि शिवार रस्त्यांना क्रमांक देणे, नोंदणी, मोजणी आणि सीमांकनासह वादांचे निराकरण करण्यासाठी रस्ता अदालतीचे केले जाणार आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर तालुक्यातील पाणंद रस्त्यांच्या क्रमांकन प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

राज्य शासनाच्या २९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार गावातील वहिवाटीचे, तसेच नकाशावरील रस्त्यांचे क्रमांकन ही प्रक्रिया महसूल विभागाच्या सेवा पंधरवडा अंतर्गत राबविण्यात येत आहे. लातूर तालुक्यातील प्रत्येक मंडळातून एक गाव प्रायोगिक तत्त्वावर निवडून ही प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. या पाणंद रस्ते मोहिमेची अंमलबजावणी कार्यक्षमतेने होण्यासाठी लातूच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी तालुक्यातील सर्व ग्रामस्तरीय महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी आणि भूमी अभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणानंतर सर्व निवडलेल्या गावांमध्ये गाव नकाशावरील तसेच प्रत्यक्ष वहिवाटीत असलेल्या रस्त्यांचे सर्वेक्षण व क्रमांकनाचे काम सुरु करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे गावांतील रस्त्यांचे अचूक दस्ताऐवजीकरण होईल. स्थानिक पातळीवरील नियोजन अधिक प्रभावी होईल. तसेच भविष्यातील शासकीय योजना राबवताना रस्ता संदर्भातील माहिती सुलभपणे उपलब्ध होईल.

हरंगुळ बु. महसूल मंडळातील बोपळा, मुरूड महसूल मंडळातील गुंफावाडी, तांदुळजा महसूल मंडळातील कासारजवळा, गातेगाव महसूल मंडळातील सामनगाव, कन्हेरी महसूल मंडळातील चांडेश्र्वर, चिंचोली बु. महसूल मंडळातील ढोकी, कासारखेडा महसूल मंडळातील नांदगाव, बाभळगाव महसूल मंडळातील बोरी आणि लातूर महसूल मंडळातील हरंगुळ खुर्द या गावांमध्ये रस्त्यांचे सर्वेक्षण व क्रमांकनाचे काम प्रगतीपथावर आहे.

# प्रवीण बागड़े यांना प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार जाहीर

नागपूर : साहित्याच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा जागृत ठेवणाऱ्या आणि विचारांची नवी दिशा देणाऱ्या साहित्यिकांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी दिला जाणारा 'प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार' यंदा नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रवीण बागडे यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी लेखनामुळे हा सन्मान त्यांना बहाल करण्यात आला आहे. प्रवीण बागडे हे गेली अनेक वर्षे मराठी साहित्य क्षेत्रात सक्रिय आहेत. वृत्तपत्रीय संपादकीय, सामाजिक जाणीव जागवणारे लेख, निवडणूक प्रक्रियेतले वास्तव, धार्मिक–सांस्कृतिक घडामोडींवरील संपादकीय शैलीतील विवेचन अशा विविध माध्यमांतून त्यांनी मराठी वाचकवर्गाला विचारप्रवण साहित्य दिले आहे. त्यांच्या लेखनशैलीत वास्तवाशी प्रामाणिकपणा, मुद्देसूद मांडणी आणि जनसामान्यांच्या समस्यांवरील स्पष्ट दृष्टिकोन यांचा समन्वय दिसून येतो.



साहित्य रत्न पुरस्कारासोबत मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि रोख रकमेचा समावेश आहे. आंबेडकरी चळवळीचा आवाज दैनिक प्रबुद्ध परिवार, नांदेड वृत्तपत्राचा १६ व्या वर्धापन दिनी होणाऱ्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रवीण बागडे यांना प्रदान करण्यात येणार असून साहित्यविश्र्वात आणि वाचकवर्गात त्यांच्या सन्मानाबद्दल उत्साहाचे वातावरण आहे. या घोषणेनंतर नागपूरसह विदर्भातील साहित्यिक वर्तुळातून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अनेकांनी त्यांच्या लेखनाला सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारे असे संबोधले आहे. तसेच प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार प्रवीण बागडे यांना मिळाल्याने मराठी साहित्य क्षेत्राचा गौरव वाढल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

यापूर्वी सुध्दा विद्यापीठात त्यांच्या उल्लेखनीय कार्य, उत्साह आणि निष्ठेसाठी 'उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार', 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार', राज्य शासनाचा अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी 'लम्पी योद्धा पुरस्कार' आणि नुकतेच देशभर राबविण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अभियानाचा विद्यापीठ अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी 'विकसित कृषी संकल्प अभियान २०२५'

पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या लागोपाठ यशस्वी प्रयत्नांचे फार कौतुक केले जाते. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली आहे. तसेच त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर ३५० वर लेख तसेच १०० वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याकडून बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या समस्यांचे निवारण

लातूर : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक



कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तसेच महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज, शनिवार, २० सप्टेंबर रोजी सकाळी बाभळगाव येथील त्यांच्या निवासस्थानी नागरिकांची भेट घेतली. लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना, तसेच काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार देशमुख यांनी नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या. त्यांच्या निवेदने आणि निमंत्रणांचा स्वीकार करून त्यांनी संबंधित विभागांना तात्काळ आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे, माजी व्हाइस चेअरमन श्रीशैल उटगे, संचालक कैलास पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, पप्पू देशमुख, व्यंकटेश पुरी, अब्दुल्ला निचलकर, विकास कांबळे, अक्षय ठाकूर, जनार्दन कुंभार, नवनाथ सुरकुटे, धनराज पाटील, रमेश कुंभार, गोविंद विभुते, श्रीकांत कुंभार, महेश नावंदर, दीपक बावणे, ज्ञानेश्र्वर पवार, पप्पू घोलप, सचिन सूर्यवंशी, श्रीकांत ठोंबरे, स्नेहलता अग्रवाल, मनीषा सुरवसे, पायल चांडक, रेणू शर्मा, ज्योती ठोंबरे, अविराजे निंबाळकर, अजित नाईकवाडे, विलास भोसले, शैलेश भोसले, बापू चव्हाण, सचिन मस्के, सुरेश चव्हाण, आरफात खान, लाला पटेल आदींसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्तीसाठी चळवळ उभा केली – सहकार मत्री नामदार बाबासाहेब पाटील

देवर्जन – मराठवाड्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी मराठवाडा मुक्तीसाठी चळवळ उभा केली म्हणूनच आपण आज स्वातंत्र्य पाहत आहोत असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी देवर्जंन तालुका उदगीर येथे केले. देवर्जन तालुका उदगीर येथे स्वातंत्र सैनिक गंगाधरराव पाटील साकोळकर यांच्या व्यक्ती व कार्य या मराठी व इंग्रजी ग्रंथाचा प्रकाशन सोहळा राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दिलीपराव देशमुख उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री



बाळासाहेब जाधव प्रा. ओमप्रकाश साकोळकर सह आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, देवर्जन हे गाव स्वातंत्र सैनिकांचे असून,या गावाने मराठवाड्यासाठी मोठ्या प्रमाणात बलिदान दिले आहे. आज आपण जे सोनेरी दिवस पाहतो ते फक्त स्वातंत्र्य सैनिकांमुळेच पहात आहोत. देशाचा विकास करायचा असेल तर खेड्याचा विकास करणे आवश्यक्य असून, त्या दृष्टीने सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे असल्याचे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले. तसेच राज्याच्या अनेक नेत्यांनी सहकाराकडे लक्ष दिले आता त्यांचाच वारसा चालवण्याची संधी मला असून मी सुद्धा मराठवाडा आणि विदर्भाकडे सहकार कसे वाढेल याकडे लक्ष देणार आहे. सोसायटीची संगणीकरण प्राधान्यने करून सहकार चळवळ रुजवण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे ना. पाटील म्हणाले. यावेळी अर्चनाताई पाटील चाकूरकर, खासदार डॉक्टर शिवाजी काळगे, आमदार संजय बनसोडे यांनी मनोगते व्यक्त केली तर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप राज्याचे माजी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केला.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# मणिपूरात मोदी पूराण ?

## संपादकीय...

भारताचे प्रधानमंत्री म्हणून गेल्या दहा, अकरा वर्षापासून नरेंद्रजी मोदी हे कार्यरत आहेत. भारतीय संघराज्यातील मणिपूर हे एक राज्य, तर तेच मणिपूर भाजपाशासीत भाजपाचे सरकार कार्यरत आहे. अदिवासी समूहाचा हा मणिपूर अदिवासीतील दोन जातीगट समूहात संघर्षमय स्थितीत आहे. जाळपोळ, लूटमार, महिलांचा छळ, अन्याय, अत्याचाराने बरबटलेला मणिपूर रोजच जळतो, विझतो, महिलांची इभ्रत वेशी, रस्त्यावर नासविली जाते, घर, दारे उध्दवस्त होत असतात, मागील एक दोन वर्षापासूनच्या मणिपूर दंगल, राजकारण, सत्ताकारावर दै. लातूर प्रभातने अनेक वेळा लिहीलेले आहे परंतू भारताच्या विकासाकडे दुर्लक्ष्य करुन परदेश वाऱ्या करण्यात गर्क असलेले विकासपुरुष प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी वेळातला वेळ काढून मणिपूरला भेट दिली आणी उध्दवस्तेच्या वाटेवरचा धगधगता मणिपूर चक्क आशेवरची साय बनून चातक बनला आणी हजारो कोटी रुपयाच्या विकास प्रकल्पाच्या कागदी जहाजावर विराजमान होवून मणिपूरच्या महिला, पुरुषांनी बोटं मोडून आनंदोत्सव साजरा करुन मणिपूर मधील विकासपूरुष मोदीपूराण गाथा ऐकून थक्क झाले नसतील तर त्यापेक्षा दुसरे नवल ते कोणते ? अशीच उत्साहावर्धक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे हेच विशेषातून विशेष वाटते.

केलेल्यांचे कौतूक न करता न केलेल्या विषयावर टीका करणारे अनेक राजकीय टीकाकार असतातच त्यापैकी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नव्हेतच कारण ते करण्याआधीच कॉंग्रेसवर, कॉंग्रेसी नेत्यावर आगफाकड करुन स्वतः ची मर्दांग्नी दाखवूनच विकासाचे कागदी घोडे नाचवित असतात. विकासाशिवाय विकास होत नाही आणी त्यास पर्याय ही नसतो. त्यासाठी भावना, कामना आणी करना यातील मध्यबिंदू शोधून तिथल्या जखमावर न बोलताच विकासाच्या जंजाळात जनतेला अडकवून सत्ताकारण करणे हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे कार्य कौशल्य कोणी ही नाकारु शकत नाही कारण मणिपूर मधील दंगल, जाळपोळ, तोडफोड, राजकीयय, सत्ताकारणातील बंड आणी महिला वरील अन्याय, अत्याचाराचा विरोधकानी भांडाफोड केला, वृतपत्रानी आवाज उठविला परंतू मपूिरच्या भाजपा सत्ताधारीनी व्यक्ती, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणला. मणिपूर धूमसत राहीले आणी आज अचानक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी मणिपूरला भेट देवून विकासाचा गोंधळी खेळ रचून खेळखंडोंबा केल्याने मणिपूरचे मोदी पूराण रमणीय, श्रवीय झाले असल्याचीच राजकीय वर्तूळात अजब, गजब प्रतिक्रया व्यक्त होताना दिसते आहे.

विशेष म्हणजे अपघातात कोणी मृत झाले, दहशतवादी हल्ल्यात लष्करी जवान शहीद झाले त्यावेळी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मृताना श्रध्दांजली अर्पण करुन त्यांच्या कुटूंबियाना आर्थीक मदत जाहीर करीत असतात परंतू मणिपूर भेटीत त्यानी अपद्ग्रस्ताना न्याय, मदत देण्याऐवजी गून्हेगारावर कार्यवाहीचे आदेश देण्याऐवजी मणिपूरच्या विकास प्रकल्पासाठी हजारो कोटीच्या खैरातीचा आदेश दिल्याने मणिपूरची जनता निश्चितच मोदीजीना जगतगुरु बनूनच पून्हा मणिपूर भेटीला यावेत अशीच सद्‌भावना व्यक्त करीत असतील तर त्यात ाश्चर्यवाटण्यासारखे कांहीच कारण नसावे, असावे असे समजू नये अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसत असली तरी बरे झाले मणिपूरमध्ये भाजपाचे सरकार आहे अन्यथा कॉंग्रेस वगैरे विरोधी पक्षाचे सरकार असते तर चक्क ईडीला पाचारण करुन सत्ताधाऱ्याना सळो की पळो करुन सोडले सते म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मणिपूर मधील मोदी पूराण यशोभाव असेच म्हणावे लागेल.

## द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी ; राजू श्रीवास्तव

प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर रोजी तिसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती. त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्र्वावर शोककळा पसरली होती.

द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या. राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत. शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले.

त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले.

त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली त्यांनी बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती. त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. २१ सप्टेंबर २०२२ रोजी त्यांचे अकाली निधन झाले. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना तिसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## संजय राऊत यांच्यावर 'माझा भोंगा, माझी बांग' हा चित्रपट काढावा

मुंबई : संजय राऊत यांनी स्व. आनंद दिघे यांच्यावर काढलेल्या चित्रपटावर प्रश्र्नचिन्ह उपस्थित करण्याची उठाठेव करू नये संजय राऊत यांच्या आयुष्यावर जर चित्रपट काढायचा ठरवले, तर त्याचे समर्पक नाव 'माझा भोंगा, माझी बांग' असे ठेवावे लागेल. कारण श्री. राऊत रोज सकाळी उठून भोंगा वाजवणे आणि बांग देणे यापलीकडे दुसरे काम करत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यावर उठसूठ टीका करण्यापेक्षा आत्मपरीक्षण करावे असा खोचक सल्ला भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी शनिवारी श्री. राऊत यांना दिला. उबाठा सेनेला कॉंग्रेसमध्ये विलीन करण्याबाबत श्री. राऊत यांनी राहुल गांधींसोबत डील केले असल्याचा सणसणीत टोलाही श्री. बन यांनी लगावला. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना भाजपामध्ये विलीन होण्याचा हास्यास्पद आरोप करणाऱ्या श्री. राऊत यांना त्यांची जागा दाखवत श्री. बन म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर शिवसेना उद्धव गटाचे विसर्जन होईल आणि त्यांच्यासमोर कॉंग्रेसमध्ये विलीन होण्याशिवाय दुसरा मार्ग उरणार नाही. श्री. राऊत हे राहुल गांधी यांची करत असलेली चमचेगीरी पाहता उबाठा गट कॉंग्रेसमध्ये विलीन करण्याबाबत राऊत यांनीच राहुल गांधींसोबत डील केले असणार.

## 'मराठवाडा मुक्तिसंग्राम - भारतीय स्वातंत्र्याचा दुसरा लढा' या विषयावरील परिसंवादास लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था शाखा लातूर आणि नवनिर्माण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात 'मराठवाडा मुक्तिसंग्राम – भारतीय स्वातंत्र्याचा दुसरा लढा ' या विषयावरील परिसंवादास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या लढ्यात तत्कालीन स्टेट कॉंग्रेस सोबतच आर्य समाज, हिंदू महासभा – राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय शिक्षण संस्था यांचे योगदान अतिशय महत्वाचे होते, हा मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या या परिसंवादाचा मुख्य केंद्रबिंदू होता.



मराठवाड्यातील सर्वसामान्य नागरिकांनी निजामाविरुद्धच्या संघर्षात सहभागी होऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला दि. १७ सप्टेंबर १९४८ ला मुक्त केले. सन १९११ ते १९४८ या कालावधीत हा लढा चालू होता. या लढ्यात समाजाच्या विविध स्तरातील नागरिकांनी आपले योगदान दिले. या संघर्षात विविध शैक्षणिक संस्था, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संघटनांचे मौलिक योगदाळ लाभले. सर्वांच्या अथक परिश्रमातून मिळालेले हे स्वातंत्र्य आपल्या व पुढील पिढीला प्रेरणादायी व्हावे म्हणून त्याबाबतचे स्मरण व सिंहावलोकन करण्याच्या उद्देशानेया परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे उदघाटन जिल्हाधिकारी वर्षा घुगे – ठाकूर यांच्या करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मणराव ( आबा ) रेड्डी हे होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन , व्यंकटेशराव महाजन महाविद्यालय, धाराशिवचे प्राचार्य प्रशांत जोशी, नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, श्री केशवराज शैक्षणिक संकुल,लातूरचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी, सचिव शैलेश कुलकर्णी, नवनिर्माण प्रतिष्ठानचे अशोक शिवणे , महेंद्र जोशी, संजय गुरव आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

या परिसंवादाच्या उदघाटक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा हा केवळ एक लढा नसून त्याग – समर्पणाचे मूर्तिमंत प्रतिक असल्याचे सांगितले. प्रत्येक लढ्याची काही वैशिष्ट्ये असतात. त्याप्रमाणे या लढ्याचीही आहेत. या लढ्यात सर्वांचा हिरीरीने सहभाग होता. या लढ्याचे मुख्य स्रोत लातूर होते, ही बाब अतिशय महत्वाची आहे. या लढ्याचा इतिहास भावी पिढीला समाजाने आवश्यक आहे. त्याकरिता या लढ्यासंबंधी अधिकाधिक पुसतक, ग्रंथ लिहिले गेले पाहिजेत. लातूर जिल्हा प्रशासनाने ही एक ग्रंथ प्रकाशित केला असून जिल्ह्यात येणाऱ्या अतिमहत्वाच्या व्यक्तींना त्याच्या प्रति भेट स्वरूपात देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. या लढ्याचा इतिहास आजही अनेकांना माहिती नाही. हा इतिहास पुढील पिढीपर्यंत प्रभावी शब्दात पोहोचविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या ऐतिहासिक विषयावरील परिसंवादाच्या माध्यमातून विचारांची देवाण घेवाण चांगल्या पद्धतीने होते, असे सांगून मराठवाडा म्हटले की, केवळ मागासलेपण असे न म्हणता मराठवाड्याच्या विविधतेचेही वर्णन तेवढ्याच सक्षमपणे होणे आवश्यक असल्याचे ठाकूर यांनी सांगितले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी यावेळी मार्गदर्शन करताना या लढ्याच्या माध्यमातून आपल्या पूर्वजांनी केलेले बलिदान, त्याग भावी पिढीने समजून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. या लढ्याच्या १९३८ ते १९४८ पर्यंतचा घटनाक्रम त्यांनी आपल्या वक्तव्यातून कथन केला. सर्वांच्या त्याग, समर्पण आणि बलिदानाचे फलित म्हणजे दि. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त झाला,असेही डॉ. महाजन यांनी सांगितले. प्राचार्य प्रशांत चौधरी यांनी आपल्या मनोगतात इतिहासात डोकावून पाहण्याचे महत्व अतिशय प्रभावी शब्दात नमूद केले. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्यात समाजातील विविध घटकांबरोबरच दलित, बहुजनांचे योगदानही अतुलनीय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास त्याग, बलिदानाचा असल्याचे सांगतानाच या परिसंवादाच्या माध्यमातून प्रवीण सरदेशमुख यांनी अत्यंत दुर्लक्षित विषय सर्वांसमोर आणल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात लक्ष्मणराव ( आबा ) रेड्डी यानिकल कोणताही असो, विघातक शक्ती ठेचून काढण्यासाठी राष्ट्रभक्तांनी सदैव तत्पर राहिले पाहिजे असे स्पष्ट केले. अशा प्रकारची परिस्थिती भविष्यात पुन्हा उदभवता कामा नये यासाठीही सर्वतोपरी प्रयत्न आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. माधवराव पाटील टाकळीकर यांनी हा विषय प्रत्येकाच्या मनात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारा असल्याचे सांगितले. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा विषय विद्यापीठाने संशोधनपर विषय म्हणून अभ्यासक्रमात सहभागी करून ग्यायला हवा,अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे विस्तृत असे प्रास्ताविक प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिका आणि महत्व विशद केले. कार्यक्रमास महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या सर्व शाळा – महाविद्यालयांचे शिक्षक – प्राध्यापक, केशवराज शैक्षणिक संकुलाचे शिक्षक – शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या परिसंवादास अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

## 'पर्पल फेअर- २०२५' कार्यक्रमात जिल्ह्यातील पाचशे दिव्यांगांचा सहभाग

लातूर, : दिव्यांग कलाकरांनी आपल्या अफाट कौशल्याने आणि जिद्दीने अविस्मरणीय नृत्य सादर केले. या दमदार सादरीकरणाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. शनिवारी शहरातील रूक्मिणी मंगल कार्यालयात झालेल्या पर्पल फेअर–२०२५ या दिव्यांगांच्या मेळाव्यात जिल्ह्यातील दिव्यांगांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय अंतर्गत दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग यांच्या समन्वयाने सिकंदराबाद येथील राष्ट्रीय बौध्दिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थेच्या सहकार्याने लातूर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा सक्षमीकरण अधिकारी कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय व हरंगुळ बु. येथील संवेदना प्रकल्प यांच्यावतीने शनिवारी जिल्ह्यातील दिव्यांगांसाठी पर्पल फेअर–२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य सुरेश पाटील होते.

समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, 'निपीड'चे सल्लागार राजेंद्र , वैद्यकीय उपअधिक्षक उध्दव माने, स्वाधार केंद्राचे अध्यक्ष हरिश्र्चंद्र सुडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी राजु गायकवाड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी दिव्यांगांनी तयार केलेल्या विविध वस्तूंच्या स्टॉलचे मान्यवरांच्या हस्ते फीत कापून उदघाटन करण्यात आले. प्रास्ताविकात राजु गायकवाड यांनी पर्पल फेअर प्रतिवर्षी गोवा येथे होतो, मात्र पिंपरी चिंचवड नंतर मराठवाड्यात प्रथमच लातूरात येथे होत असल्याचे सांगितले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी यांनी दिव्यांगाचा ५ टक्के सेस निधीचा दिव्यांग सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या संस्थांनी उत्तम वापर केल्याचे सांगत दिव्यांगांच्या विविध स्टॉलमधील कलेला दाद दिली. प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांनी लातूर विभागात प्रथमच अंधांसाठी विशेष टंकलेखन, मुकबधिर विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईड व ढोल पथक राबविल्याचे सांगितले. तर सुरेश पाटील यांनी असा उत्सव जिल्हा परिषदेच्या माध्यमातूनही व्हावा, तसेच दिव्यांगांच्या साहित्य व वस्तु प्रदर्शनाचे मार्केटींग आवश्यक असल्याचे नमुद केले.

अतिरिक्त जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांनी या कार्यक्रमास भेट देवून दिव्यांगांच्या कलागुणांना दाद दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व्यंकट लामजने, डॉ. मयुरी बिल्लावार यांनी केले. तर आभार जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी मानले. यशस्वीतेसाठी सहायक सल्लागार बाळासाहेब वाकडे, अण्णासाहेब कदम, बसवराज पैके यांच्यासह दिव्यांग शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**दिव्यांगांच्या कलेला दाद**

पर्पल फेअर–२०२५ या कार्यक्रमात जिल्ह्यातील ३० दिव्यांग शाळांतील ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये लेझीम नृत्य, गीत गायन, आदिवासी नृत्य्, समूह नृत्य, हालगी, थीम डान्स, एकल नृत्य इत्यादी प्रकार सादर केले. यासोबतच सर्वसमावेशक क्रीडा स्पर्धा, यशोगाथा, पालक प्रशिक्षण, रोजगार मेळावा, साहित्य व कला प्रदर्शनी, पुस्तक प्रदर्शनी आदीबाबत स्टॉल उभारण्यात आले होते. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या आनंद मानकोसकर, गौर शेख, हरीश भाईपुरी या दिव्यांग व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात आला.

## झरोका

एक – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना कॉंग्रेसी गवताची की, कॉंग्रेसच्या धोरणाचा रो जडला आहे काय तेच कळत नाही, त्यासाठी वैद्य ही सापडत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, तूला वेड लागलंय काय, १९७२ च्या दुष्काळात अमेरिकेने मिलू ज्वारी दिली होती तेंव्हा कॉंग्रेसने हे काय असा दावा`ला होता त्यावेळी तो एका गवतातील धान्याचा प्रकार होता असा निर्वाळा मिळाला तो कॉंग्रेसने संपूष्टात आणला. परंतू आजघडीला अमेरिकेचे डोनाल्ड ट्रम्प हेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना संपूष्टात आणत असल्याने मोदीजी कॉंग्रेसनेबिहारी जनतेला बिडी सोबत गणती करुन अवमान केला अशी गरळ ओकतात तो त्यांचा पंतप्रधानकीतील कार्याचा एक अजेंडाच आहे मग कॉंग्रेसी रोग वगैरे म्हणून गोंधळात कशाला पडतोस, शांत बस.

एक – अहो, बिहारमध्ये नितिशकुमार यांची सत्ता आहे, भाजपाची नाही मग कॉंग्रेस, राजदला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लक्ष्य कशासाठी करीत आहेत तेच कळत नाही, म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, नितिशकुमार हे लोकसभा निवडणूकीत इंडिया बरोबर होते, परंतू सत्ताकारणात चंद्राबाबू आणि नितीशकुमार यानी मोदीजीना साथ दिली म्हणूनते पंतप्रधान बनू शकले परंतू केरळ कॉंग्रेसने बिहारमधील तंबाखू, बिडी उत्पादकावर केंद्र सरकारने कर लादला असल्याने नितिशकुमार यांचा चिमटा घेतला तो धागा पकडून मोदीजी कॉंग्रेस, राजद वर टिका करतात त्यात नवीन काय आहे.

एक – अहो, पण नेहमीच विरोधकावर टीका करणे हे पंतप्रधान पदावरील व्यक्तीला शोभत नाही पण...

दुसरा – अरे, दुसरे कांही हातात नसेल तर उणे, दूणे काढून हौस पूरविण्याशिवाय मोदीजीकडके दुसरे काय आहे, समजलं !

## काय बोलता राव ?

तब्बल साठ ६० वर्ष कॉंग्रेसमध्ये राहून स्थानीक, राज्यस्तरीय, केंद्रीय सत्ता भोगणाऱ्या दिवंगत शंकरराव चव्हाण यांचे पूत्र खा. अशोकराव चव्हाण याना कॉंग्रेस सोडून भाजपात गेल्यावर वनवासाची वेळ आली अशीच कुजबूज नांदेड परिसरात होते आहे याचे काय, होतास तू, काय झालास तू, अरे वड्या वाया गेलास तू, अशीच कुजबूज खा. अशोकराव चव्हाण यांच्या बद्दल होताना दिसते आहे.

**काय बोलता राव !**

अरे, कॉंग्रेसने शंकरराव चव्हाण यांना महाराष्ट्रात मंत्री, मुख्यमंत्री केले, केंद्रात मंत्री, गृहमंत्री केले, पून्हा अशोकराव चव्हाण याना मंत्री, प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री पद दोन वेळा दिले पण आदर्श घोटाळा मानगूटीवर बसला. अशोकराव भाजपात गेले, पण सत्तापद नाही, उलट स्थानीक स्वराज्य संस्था निवडणूकी दरम्यानही अशोकरावाना नांदेडची जनता जवळ करेनाशी झाली आहे मग साठ वर्षाची कॉंग्रेस सत्ता धूळीस गेली आता चौदा वर्षाचा भाजपा बनवासही पूर्णत्वास जातो की नाही हेच कळेनासे झाले असल्याने भाजपा की कॉंग्रेस हे एक कोडे अशोकरावाना खेळवित असल्याचीच भिती वाटत असावी मग काय बोला दाजीबा !



# दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांअंतर्गत बांधकाम कामगार स्थानिक संनियंत्रण समिति व विभागीय संनियंत्रण समिति गठित करण्याबाबत दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी आदेश काढण्यात आला त्याचा जाहीर निषेध झाला पाहिजे.या आदेशाची जाहीर होळी झाली पाहिजे कारण ज्या आमदारांनी जाहीरपणे बांधकाम कामगारांचे नांव नोंदणी शिबिर घेतले लगेच दुसऱ्या दिवशी भांडे वाटप झाले.याची कोणती ही चौकशी दक्षता पथकाने केली नाही.असे असतांना ९ सप्टेंबरचा स्थानिक संनियंत्रण समिति व विभागीय संनियंत्रण समिति गठित करण्याबाबतचा आदेश म्हणजे कामगारांच्या कल्याणकारी योजनेच्या निधीवर दिवस ढवल्या दरोडा टाकण्याचा परवाना देण्या सारखा आहे त्यांचा आम्ही स्वतंत्र कृती समितीच्या वतीने जाहीर निषेध करतो.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांच्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांच्या घरी जाऊन दलालांनी अर्ज भरून घेतले गेले.त्यासाठी रोजदारीवर आणि कमिशनवर बाई माणसं ठेवण्यात आली होती.तेच लोक भांडे वाटपाची माहिती देऊन अर्ज भरून आणत होती. त्यानंतर दलालच्या सेतु कार्यालयात त्यांनीच ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावर ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या बनावट सही व शिक्के कॉपी पेस्टच्या आधारे तयार केली.तालुका कामगार सुविधा केंद्रावर कोणत्या दलालाच्या मार्फत अर्ज आले त्यावर काही चिन्ह टाकण्यात आली. टिक असलेले अर्ज तालुका कामगार सुविधा केंद्रांवरील कंत्राटी कर्मचारी आणि आरो यांनी प्रत्येक अर्ज मागे रक्कम ठरली ती मिळाली,तरच त्यांचीच त्यानुसार बांधकाम कामगार म्हणून बोगस नांव नोंदणी करून घेतली, आपोआप झाली नाही. त्यांनाच भांडे व पेटी वाटप झाले. कामगार संघटना कडून आलेले खऱ्या कामगारांचे अर्ज काही रक्कम मिळत नसल्यामुळे ग्रामसेवक व ठेकेदार यांच्या ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावरील आवक क्रमांक दिनांक ठरलेल्या जागी नसलातर अर्ज नाकरल्या जात होते.सही व शिक्का असतांना देखील काहीना काही क्षुल्लक कारणाने नाकरल्या जातो.इंजिनियर, ठेकेदारांचे वर्क ऑर्डर,बँक डिटेल मागण्यात येते होते.खऱ्या कामगारांची त्याची सर्व कागदपत्रे बरोबर असतांना हेतुपुरस्सर अर्ज त्रुटी काढल्या गेल्या.आणि खऱ्या कामगारांची अर्ज रद्द केला गेले.मग बोगस नांव नोंदणी कोणी केली त्यावर गुन्हे दाखल झाले काय ?. दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?.हे जाहीर होतांना दिसत नाही.हे कंत्राटी कर्मचारी व अधिकारी यांना वाचवण्यासाठी चालले नाटक होते.यांचे अनेक पुरावे संघटनांनी सादर केले त्यांची दखल घेतल्या गेली नाही. कामगार संघटनाची दिशाभूल करण्यासाठी हे दक्षता पथक तपासणीचे ढोंग होते हे आता सिध्द झाले आहे.

आम्ही महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समितीच्या वतीने २४/०४/२०२४ पासून सतत पत्रव्यवहार करीत आहोत.सप्टेंबर २०२४ ला आचार संहितेचा नांवाखाली पोर्टल बंद करण्यात आले होते. त्याविरोधात याचिका दाखल केली होती.तिचा निकाल ६ नोव्हेंबर २०२४ लागला होता.सरकारने त्यांची अंमलबजावणी केली नाही.पत्राचे उत्तर मिळत नाही त्यावर चर्चा होत नाही.म्हणून १२ डिसेंबर २०२४ ला आम्ही कॉम्रेड शंकर पूजारीच्या नेतृत्वाखाली मंत्रालायत धडक मारली,ईमेल, पत्राची दखल घेऊन उत्तर दिले जात नाही,चर्चा केली जात नाही,म्हणून सत्तर नोंदणीकृत कामगार संघटना पदाधिकारी यांनी प्रधान सचिव कामगार मा.विनीत सिंगल वेद मॅडम यांच्या कार्यालयत भेटीसाठी धडक दिली असता. त्यांच्या सचिवांनी पूर्व परवानगी नसल्यामुळे भेटता येणार नाही असे सांगितले.आम्ही तीन महीने झाले भेटण्याची वेळ तारीख मागतो,ईमेल देतो.त्याचे उतर मिळत नाही मग काय करायला पाहिजे.भेट घेतल्या शिवाय आम्ही जाणार नाही.बोलवा पोलिसांना अशी जोरजोरात ओरडा ओरड झाल्यामुळे विनीत सिंगल वेद मॅडम बाहेर आल्या आणि काय झाले यांची चौकशी केली आणि सर्वांना कॅबिन मध्ये घेऊन सर्व समस्या वर चर्चा केली. लवकरच समितीच्या शिष्टमंडळा बरोबर संयुक्त बैठक लावण्याचे आश्र्वासहन दिले होते. त्यानंतर त्यांची बदली झाली त्यांच्या जागी मा.आय ए कुंदन मॅडम आल्या त्यांना आम्ही सर्व पत्रव्यवहार करून माहिती दिली भेटण्याची वेळ तारीख मागितली.मी नवीन आहे संपूर्ण माहिती घेतो आणि बोलवतो असे तोंडी आश्र्वासन मिळाले.आम्ही १८ डिसेंबर २०२४ ला नागपूर हिवाळी अधिवेशनवर भव्य मोर्चा काढला.तेव्हा मंत्र्यांचे खाते वाटप झाले नव्हते. मान.अतुल सावे माजी मंत्री यांनी निवेदन स्वीकारले आणि नवीन कामगार मंत्री आले की त्यांच्या सोबत आपली मीटिंग लावून देतो असे आश्र्वासन दिले.

१२ डिसेंबर २०२४ ते १२ जानेवारी २०२५ एक महिना झाला. आम्ही सतत तिसऱ्या दिवशी ईमेल वर वेळ मागत होतो.शेवटी १५ जानेवारीला सतर कामगार संघटनेचे पदाधिकारी कुंदन मॅडमला भेटण्यासाठी मंत्रालयात त्यांच्या कार्यालयात भेटी साठी गेलो असतात.तेच उत्तर ईमेल मिळाला नाही,परवानगी नाही.मागच्या सारखी ओरडा ओरड नंतर पाच प्रतिनिधीना आत मध्ये घेऊन चर्चा तुम्ही कामगार संघटना वाले दलाल आहात तुम्ही कामगारांकडून पैसे गोळा करता असा आरोप मॅडम नी केला.कॉम्रेड




शंकर पुजारी यांनी सर्व पुरावे दाखविण्याचा प्रयत्न केला असतात. त्यांनी आवाज चडवून बोलू नका असा दमच दिला,बोलू नका नाहीतर पोलिसांना बोलावून अटक करण्यास सांगेल अशी धमकी दिली. पण गेली तीस चाळीस वर्ष कामगार चळवळीचे नेतृत्व करणारी व्यक्ति वयाच्या ७५ व्या वर्षी त्याच उमदीने कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करतो.त्याचा आवाज बंद करणे शक्य नव्हते.तेव्हा कुंदन मॅडम ने पोलिसांना बोलावले ए सी पी साहेब त्यांची मंत्रालय सुरक्षा अधिकारी टीम आली त्यांनी २२ जिल्ह्यातील २२ संघटना पदाधिकारी यांना ताब्यात घेतले.शंकर पुजारी वयोवृद्ध व आजारी असल्या कारणाने त्यांना गेटच्या बाहेर सोडण्याचे सांगितले.तेव्हा मी सागर तायडे मुंबई,प्रशांत रामटेके वर्धा,प्रशांत मेश्राम अकोला,रत्नपाल डोफे यवतमाळ यांच्याशी कुंदन मॅडम यांनी संघटना आणि दलाल यांची काम करण्याची पद्धत समजून घेतली.लवकरच आपण याविषयावर संयुक्त बैठक बोलावू असे सांगितले.परंतु १५ जानेवारी २०२५ पासून आज पर्यन्त स्वतंत्र कृती समितीला चर्चा करण्यासाठी वेळ, तारीख दिली गेली नाही.पत्राचे ईमेल चे उतर मिळाले नाही.याबाबत आम्ही उप पोलिस आयुक्त मंत्रालय सुरक्षा यांना पत्र दिले आहे.

भारतीय ट्रेड युनियन ॲक्ट १९२६ च्या कायद्यानुसार नोंदणीकृत कामगार संघटना ना सोबत घेऊन काम करण्याचा हा महाराष्ट्र शासन महत्त्वाचे अति तात्काळ क्रमांक :- इबांका-२०१७/प्र.क्र.३७२/कक्ष-७, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग मादाम कामा मार्ग मंत्रालय राजगुरू चौक मंत्रालय मुंबई-४०००३२. दिनांक १५ सप्टेंबर २०१७,प्रती. कामगार आयुक्त कामगार भवन ई ब्लॉक सी -२०,बांद्रा कुर्ला संकुल बांद्रा पूर्व मुंबई ४०००२१,विषय:- बांधकाम कामगारांचे कायद्या अंतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) नोंदणीकृत मजदूर संघटनेकडून दाखल करून घेण्याबाबत. संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे क्र.मइवइबांकमं शासन संदर्भ-४/२०१७,दिनांक २९/०५/२०१७, दत्तात्रेय य.डांगे कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्या सहीचे आदेश यांनी पायदळी तुडवळा आहे. जन सूनवाई विधायक मंजूर होण्या अगोदर हे सरकार त्याचे प्रशासकीय अधिकारी अशा पद्धतीने न्याय देत आहेत.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गत राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना द्याव्याच्या भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम देण्याबाबत महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग. शासन निर्णय क्रमांक इमारत २०१४/प्र.क्र. ८/कामगार ७ अ, बादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय मुंबई ४०००३२,तारीख २६ मे २०१४,सही- दि.सो. राजपूत सह सचिव महाराष्ट्र शासन. असा आदेश असतांना ही सुरक्षा संच,पेटी वाटप,भांडे वाटप करण्यात आले. असा आदेश असतांना कामगार मंत्र्यांना अचानक कशी काय जाग आली?. काम करता असतांना कामगारांना सुरक्षा साहित्य कंत्राटदार यांनी देणे बंधनकारक असतांना कल्याणकारी मंडळाने नाका बांधकाम कामगार यांना सुरक्षा संच वाटप का केले?.

दलालांनी दिलेल्या बोगस ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची तालुका कामगार सुविधा केंद्रातील कर्मचारी यांनी चौकशी न करता अर्ज दाखल कसा करून घेतला.त्यांनीच नोंदणी अधिकारी यांची सही घेऊन मंजूरी घेतली.चौकशी न करता नोंदणी अधिकाऱ्यांनी सही करून मंजुरी कशी दिली?. हा महा भ्रष्ट युतीचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी दक्षता पथक तपासणीची स्थापना करण्यात आली ३५८ तालुका कामगार सुविधा केंद्रातील तपासणी पूर्ण झाली. किती बोगस कामगार दलाल पकडले?.कंत्राटी कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर काय कारवाई झाली आहे?. हे जाहीर का होत नाही?.कामगार मंत्र्यांनी विधानसभागृहात आमदारांच्या प्रश्र्नाला दिलेल्या दिली त्यांची अंमलबजावणी कधी होणार?.

सरकारने व कल्याणकारी मंडळाच्या सचिवाने आपल्या बीओसीडब्लू (इजउथ) विभागातील विभाग प्रमुख व कर्मचारी आरो यांचा बचाव करण्यासाठी जे एजेंट दलाला गावोगावी निर्माण केले.त्यांचीच बीओसीडब्लू (इजउथ) विभाग प्रमुखाची दक्षता समितीवर नेमणूक केली.वास्तविक पाहता ज्या ट्रेड युनियनच्या लोकांनी पुराव्यासह आवाज उठवून सरकारच्या व मंडळाच्या सचिवांच्या लक्षात आणुन देण्याचे काम कामगार संघटनांनी केले. त्यांना सोबत घेऊन काम करणे आवश्यक होते.

एजेंट दलाल यांनी गावोगाव जाऊन ग्रामसेवक,ठेकेदार यांचा बनावट शिक्का तयार करून ९० दिवसांच्या प्रमाणपत्रावर बनावट सही व शिक्के मारून तसेच आधार कार्डावरचा एक साईट पत्ता बदलून मंडळामध्ये बोगस नाव नोंदणी करणाऱ्या फिरस्ती दलाल एजंट यांच्या साखळीत असणाऱ्या तालुका कामगार सुविधा केंद्र प्रमुख व कर्मचारी तसेच आरो यांची चौकशी दक्षता पथकाने केली पाहिजे होते,तेव्हा कुठे फिरस्ती दलाल एजंट शोधून काढता आले असते.या संदर्भात आम्ही संघटनेच्या वतीने वारंवार सरकारी कामगार अधिकारी,सहाय्यक कामगार आयुक्त,कामगार आयुक्त साहेब,कामगार मंत्री साहेब, कामगार प्रधान सचिव तसेच कल्याणकारी मंडळाचे सचिव यांच्याकडे पुराव्यासह एजेंट दलाल यांच्या नावा सहित तक्रारी ईमेल द्वारे आणि पत्राद्वारे केले आहेत. परंतु त्यांची अद्याप पर्यंत कोणत्याही दखल घेऊन कोणत्याही प्रकारची चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात आली नाही. मग दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?.

आम्ही भारतीय संविधान मानणारे लोक आहोत म्हणून आपणास लोकशाहीच्या चौकटीत सनदशीर मार्गाने भेटण्यासाठी चर्चा करण्यासाठी वेळ व तारीख मागत आलो आहोत. त्यांची दखल घेतल्या जात नाही म्हणूनच १२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ वाजता आझाद मैदान मुंबई येथे लक्षवेधी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.त्यात ७४ नोंदणीकृत कामगार संघटनांनी सहभाग नोंदवला होता.त्यावेळी प्रमुख मागण्या.१) बांधकाम कामगारांचे कायद्यांतर्गत नोंदणीसाठी व लाभासाठीचे अर्ज (प्रस्ताव) ट्रेड युनियन ऍक्ट नुसार नोंदणीकृत कामगार संघटने कडून दाखल करून घेण्याबाबत सोबत महाराष्ट्र शासन आदेश दिनांक १५ सप्टेंबर २०१७ ची अंमलबजावणी करण्यात यावी.मंडळावर कामगार संघटना प्रतिनिधी घेण्यात यावे.२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्गे त राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना द्यावयाच्या भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम देणेबाबत महाराष्ट्र शासन आदेश दिनांक २६ मे २०१४ ची अंमलबजावणी करण्याबाबत.३) केंद्राचे इ प्रशासन धोरण लागू करण्याबाबत.४) तालुका कामगार सुविधा केंद्र महाभ्रष्टयुती आणि भ्रष्टाचारांची केंद्र झाली आहेत. त्यामुळे ती तत्काळ बंद करण्यात यावी.५) कल्याणकारी मंडळाचे सोशल ऑडिट जाहीर झाले पाहिजे.६) कर्नाटक,राजस्थान राज्याच्या धर्तीवर नोंदणीकृत व लाभार्थी कामगारांची नांवे,गांव,रक्कम पोर्टल वर जाहीर करण्यात आली पाहिजेत.मान.कामगार मंत्री यांनी निवेदन स्वीकारून लवकरच संयुक्त मिटिग लावण्याचे आश्र्वासन स्वतंत्र कृती समितीच्या शिष्टमंडळास दिले होते. पण अद्याप मीटिंग झाली नाही. दक्षता पथक तपासणीचे काय झाले ?.किती बोगस कामगार दलाल पकडले?.याचे उत्तर मिळाले नाही.असे असतांना ९ सप्टेंबरचा स्थानिक संनियंत्रण समिति व विभागीय संनियंत्रण समिति गठित करण्याबाबतचा आदेश म्हणजे कामगारांच्या कल्याणकारी योजनेच्या निधीवर दिवस ढवल्या दरोडा टाकण्याचा परवाना देण्या सारखा आहे त्यांचा आम्ही स्वतंत्र कृती समितीच्या वतीने जाहीर निषेध करतो.

**आपला**
**सागर रामभाऊ तायडे ९९२०४०३८५९,**
**अध्यक्ष :- महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वतंत्र कृती समिती**

## इतिहासात आजचा दिवस २१ सप्टेंबर २०२५

अंतरराष्ट्रीय

१९१५ - सी.एच. चब यांनी सटोन हेंग आणि या आंतरराष्ट्रीय ठेव्याचा परिसर फक्त सहा हजार पौंडास विकत घेतले.

२००६ - अटलांटिस यान सुखरूपपणे पृथ्वीवर परतले.

२००७ - मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स सलग १४ व्या वर्षी सर्वात श्रीमंत अमेरिकन व्यक्ती बनले.

राष्ट्रीय

१६८७- औरंगजेबाने गोवळकोंड्यास वेढा घालून कुतुबशाही संपुष्टात आणली.

१९६२ - चिनी सैनिकांनी 'नफा' वर गोळीबार करुन तीन भारतीय सैनिक ठार मारले. पुढील महिन्यात झालेल्या चिनी आक्रमणाची ही चुणूकच होती.

२००४ - 'पोटा' रद्द करणारा वटहुकूम जारी.

२००६ - भारतीय समाजात अस्तित्वात असलेली बालविवाहसारखी वाईट प्रथा संपुष्टात आणण्यासाठी सरकारने एक नवीन विधेयक आणण्याचा निर्णय घेतला.

२००७ - मूसाखेडा हत्याकांड प्रकरणी किशनगडच्या न्यायालयाने दोषी ठरविण्यात आलेल्या २० जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

२००७ - 'सामना' दैनिकातून उत्तर भारतीयांविरोधात अवमानकारक मजकूर केल्याप्रकरणी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अटक आणि सुटका.

जन्म

१३२८ - हाँग्वू, चीनी स्म्राट.
१४१५ - फ्रेडरिक तिसरा, पवित्र रोमन स्म्राट.
१४२८ - जिंग्टाइ, चीनी स्म्राट.
१७५६ - जॉन मॅकऍडम, स्कॉटिश रस्ता-तंत्रज्ञ.
१८४० - मुराद पाचवा, ऑट्टोमन स्म्राट.
१८४२ - अब्दुल हमीद दुसरा, ऑट्टोमन स्म्राट.
१८६६ - एच.जी. वेल्स, अमेरिकन लेखक.
१९०२ - लियरी कॉन्सन्टाईन, वेस्ट ईंडीझचा क्रिकेट खेळाडू.
१९३२ - पंडित जितेंद्र अभिषेकी, भारतीय-मराठी गायक, मराठी संगीतकार.
१९४७ - स्टीवन किंग, अमेरिकन लेखक.
१९५० - बिल मरे, अमेरिकन अभिनेता.
१९५१ - अस्लान माश्काडोव्ह, चेचेन क्रांतीकारी.
१९५९ - रिचर्ड एलिसन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९६३ - कर्टली ऍम्ब्रोस, वेस्ट ईंडीझचा क्रिकेट खेळाडू.
१९७१ - जॉन क्रॉली, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९७१ - ऍडम हकल, झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू.
१९७९ - क्रिस गेल, वेस्ट ईंडीझचा क्रिकेट खेळाडू.
१९८० - करीना कपूर, भारतीय अभिनेत्री.

निधन

ई.स.पू. १९ - व्हर्जिल, रोमन कवि.
१३२७ - एडवर्ड तिसरा, ईंग्लंडचा राजा.
१५५८ - चार्ल्स पाचवा, पवित्र रोमन स्म्राट.
१७४३ - सवाई जयसिंह, जयपूर संस्थानाचा राजा.
१९३९ - आर्मांड कॅलिनेस्कु, रोमेनियाचा पंतप्रधान.
१९५७ - हाकोन सातवा, नॉर्वेचा राजा.
१९९४ - रामकृष्ण बजाज प्रसिध्द उद्योगपती आणि ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक.
१९९८ - फ्लोरेंस ग्रिफिथ जॉयनर, अमेरिकन धावपटू.
१९९९ - पुरुषोत्तम दारव्हेकर, मराठी नाटककार, मराठी नाट्यदिग्दर्शक.

प्रतिवार्षिक पालन

आंतरराष्ट्रीय शांति दिन.

स्वातंत्र्य दिन - माल्टा, बेलिझ, आर्मेनिया.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील नितेश दिनानाथ भुतडा कुटुंबीयांचे केले सांत्वन

लातूर प्रतिनिधी : लातूर शहरातील सुप्रसिद्ध व्यापारी दिनानाथ नारायणदास भुतडा यांचे नुकतेच निधन झाले आहे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील सुभाष चौक परिसरातील द्वारका नगरी येथील नितेश दिनानाथ भुतडा यांच्या निवासस्थानी भेट देऊन भुतडा कुटुंबियांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला यावेळी नितेश दिनानाथ भुतडा, प्रितेश दिनानाथ भुतडा, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शहा, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, धनराज भुतडा, श्रीराम भुतडा, श्रीकांत भुतडा, जुगलकिशोर झंवर आदिसह भुतडा कुटुंबीय मित्र परिवार उपस्थित होते.



# स्त्रियांच्या आरोग्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो वेळीच काळजी घेणे गरजेचे - सौ. संजीवनीताई कराड

लातूर - महिला सुदृढ, सशक्त असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहतं. स्त्रिया निरोगी नसतील तर त्यांच्या आरोग्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो तेव्हा प्रत्येक महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे नितांत गरजेचे आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर येथील महिला आरोग्य शिबिरात बोलताना केले.

स्त्री शक्तीला आरोग्य शक्तीची साथ ठरणार विकसित भारताचा आधार यानुसार संपूर्ण देशात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या दरम्यान स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे अभियान राबवले जात असून रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात महिला, मुलींसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिर १९ सप्टेंबर शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, आरोग्य सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिता अलगुले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सौ. कराड यांच्या हस्ते ८ क्षय रुग्णांना निक्षय मित्र योजनेअंतर्गत फूड बास्केटचे तसेच अवयव दान प्रमाण पत्रांचे वाटप केले. या शिबिरात मोठा प्रतिसाद मिळाला.



देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब आणि राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वातील शासन महिलांची आरोग्यसह सर्व प्रकारची काळजी घेणारे शासन असल्याचे सांगून सौ. संजीवनीताई कराड म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य शासनाने महिलांसाठी विविध अनेक योजना सुरू केल्या आहेत. शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन महिलांनी आत्मनिर्भर बनावे. स्वस्थ नारी सशक्त परिवार या अभियानाच्या माध्यमातून महिलांनी सर्व प्रकारच्या आरोग्य तपासण्या करून निरोगी राहावे असा सल्ला देऊन स्त्रियांच्या आरोग्याचे महत्त्व विषद केले.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिता अलगुले यांनी स्त्रियांच्या विविध आजारांबद्दल माहिती देऊन रुग्णालयातील सर्व तपासणी व उपचार सुविधा बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहाय्यक संचालक डॉ. संजय ढगे सर, डॉ. मोनिका पाटील व डॉ. प्राची हरिदास यांनीही उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

या शिबिरामध्ये ५१० महिलांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २८ गरोदर महिलांची तपासणी करण्यात आली. ३१ बालकांना लस देण्यात आली. ३३१ महिलांची रक्तदाब आणि मधुमेहासाठी तपासण्या करण्यात आल्या. गर्भाशय मुख कर्करोगासाठी ६१ महिलाची तर स्तन कर्करोगासाठी २८ महिलांची तपासणी करण्यात आली. ४५ महिलांची कान नाक घसा तपासणी आणि ६१ महिलांची डोळे तपासणी करण्यात आली. ७७ लहान मुलांची तपासणी करण्यात आली. यावेळी ८ जणांनी रक्तदान केले. ६ छोट्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

या शिबिरात लातूर येथील एमआयटी मेडिकल कॉलेज आणि विलासराव देशमुख शासकीय मेडिकल कॉलेज मधील तज्ञ तसेच शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व रुग्णांची तपासणी व निदान केले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिता अलगुले, भूलतज्ज्ञ डॉ. विकास नारायणकर, भीषक तज्ञ डॉ. भालेराव, मनोविकार तज्ञ डॉ. तडीखेळकर, बालरोग तज्ञ डॉ. धुमाळ, डॉ. मोनिका पाटील, नाक कान घसा तज्ञ डॉ. प्राची हरिदास, आयुष विभाग डॉ. बनशेलकीकर, डॉ. स्नेहा देशमुख, दंत शल्यचिकित्सक डॉ. भाग्योदय बरेवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. संध्या घोगरे, डॉ. वैशाली बनसुडे, डॉ. शमीम शेख, डॉ. कल्लाप्पा हालकुडे, अधिपरिचारिका श्रीमती जनाबाई नागरगोजे, औषध निर्माण अधिकारी श्रीमती सुवर्णा तडकले, मनोज बंडे, सुनीता कस्तुरे, शुभांगी सावंत, विनोद राठोड, अधिपरिचारक प्रमोद पाटील, स्वाती गडबे, माधवी मेत्रे, मंजुषा भोसले, ज्योती गायके, लक्ष्मी कांबळे, अनुराधा जाधव, संजीवनी शेप, डाटा एन्ट्री ऑपरेटर आमिर शेख यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे 'फार्मा ब्रेन्स क्विझ स्पर्धा-२०२५' यशस्वीरीत्या पार पडली

लातूर : दयानंद एज्युकेशन सोसायटी संचालित दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर येथे 'फार्मा ब्रेन्स क्विझ स्पर्धा-२०२५' मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतांचा विकास, तसेच फार्मसी क्षेत्रातील शैक्षणिक गुणवत्तावृद्धी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत लातूर परिसरातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील एकूण १२५ बी. फार्मसी व डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. औषधनिर्मितीशास्त्र, औषधशास्त्र, तंत्रज्ञान, तसेच चालू घडामोडींवरील प्रश्र्नांना विद्यार्थ्यांनी दिलेल्या परखड व रोचक उत्तरांमुळे स्पर्धा अत्यंत रंगतदार झाली. स्पर्धेचे समन्वयक सहाय्यक प्रा. अरुण कोंडापूरे व प्रा. रोहित ऊसनाळे यांनी नियमावली स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परीक्षक म्हणून प्रा. कुलदीप पवार यांनी कार्यभार सांभाळला. विजेत्यांची घोषणा दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी 'फार्मासिस्ट डे' निमित्त करण्यात येणार असून सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ई-सर्टिफिकेट्स प्रदान करण्यात येतील, असे आयोजकांनी सांगितले. या प्रसंगी दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी या उपक्रमाचे कौतुक व्यक्त केले. तसेच दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षांविषयी आत्मविश्र्वास वाढतो व ज्ञान अधिक दृढ होते, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी यांचे योगदान लक्षणीय ठरले.



# उपदेशकथा
# बळीची अवस्था

राजा बळी महान व्याक्तिंमत्व असलेला पूज्य पुरुष होता. भगवान विष्णूने वामनरूप घेतले आणि बळीला पाताळात लोटले. त्याची मनास्थिती कशी आहे हे पाहण्यास विष्णू नारदाला म्हणाला, 'नारदा ! एकदा बळीला भेटून ये.' त्याप्रमाणे नारद बळीकडे गेले. बळीने त्यांचे स्वागत केले व येण्याचे कारण विचारले. नारद म्हणाले, 'तू राज्यभ्रष्ट झालास. तुझे सर्व गम ावले. आता तू कसा राहातोस हे प्रत्यक्ष पहावे म्हणून मी आलो.' आपली अवस्था सांगताना बळी म्हणाला, 'नारदा ! मी खरोखर समाधानी आहे. कारण जीवनामध्ये कोणतीही वस्तू ास्थिर नाही. कोणतीही घटना निश्चित नाही. काळ सर्वांवर स्वामि त्त्व गाजवतो. काळाचे अद्भूत रहस्य ओळखून मी कोणत्याही अवस्थेचे फार सुख-दु:ख करीत नाही. काळ देतो व तोच हरण करतो. भविष्याच्या पोटात काय असते कोणास ठाऊक ! म्हणून मी देह काळाच्या स्वाधीन करून मनाने स्वरूपचिंतन करतो. मला काळाचे बंधन नाही.'

कथा उपदेश : भक्ताला काळाचे बंधन नाही.

## मुलाखतीला जाताना 'हे' ५ पदार्थ अजिबातच खाऊ नका, गोष्ट महागात पडेल

आपल्या स्वप्नातील नोकरीच्या मुलाखतीला जाताना आपण खूप काळजी घेतो. अगदी सगळी तयारी १०० टक्के करुन जातो. पण अगदी मुलाखतीला जातानाच तुमच्या पोटातून काही तरी आवाज येतो. अस्वस्थ वाटू लागलेच तर तुमच्या चेहऱ्यावरचे हाव भाव बदलू लागतात. एवढंच नव्हे तर तुम्हाला अनेक गोष्टी येऊनही करण्याच इच्छा राहत नाही.

आपण अनेकदा या गोष्टीकडे सहसा जास्त लक्ष देत नाही, पण खरंच आपला आहार खूप मोठी भूमिका बजावते. अशा लाजिरवाण्या परिस्थिती टाळण्यासाठी काही पदार्थ आहेत जे मुलाखतीला जाण्यापूर्वी पूर्णपणे टाळले पाहिजेत.

कांदा आणि लसूण: कांदा आणि लसूण भारतीय पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. नोकरीच्या मुलाखतीसाठी जाताना, ते पदार्थ खाणे टाळणे चांगले. या दोन्ही पदार्थांना तीव्र वास येतो आणि श्वासात दुर्गंधी येऊ शकते. हे तुमच्या मुलाखतीत नकारात्मक पहिली छाप टाकू शकते, कारण हे दर्शवते की तुम्ही तुमच्या स्वच्छतेबद्दल जागरूक नाही. श्वासाच्या दुर्गंधीव्यतिरिक्त, कांदे आणि लसूण देखील मुलाखतीदरम्यान सूज आणि अस्वस्थता आणू शकतात. तुमच्याकडे ते असले तरीही, आत जाण्यापूर्वी नेहमी छान ब्रश केल्याचे सुनिश्चित करा.

तळलेले पदार्थ:आम्हाला अनेकदा तळलेले पदार्थ शक्यतो टाळण्याचा सल्ला दिला जातो. ते खूपच अस्वास्थ्यकर आहेत आणि त्यात कोणतेही आवश्यक पोषक तत्व नसतात. नोकरीच्या मुलाखतीला जाण्यापूर्वी ते टाळले पाहिजेत हे आश्चर्यकारक नाही. तळलेले पदार्थ तेलाने भरलेले असल्याने, तुम्हाला अपचन किंवा सूज येण्याची शक्यता जास्त असते. ते तुमच्या पोटात गुरगुरणारा आवाज देखील करू शकतात आणि हे खूपच लाजिरवाणे असू शकते. हे टाळण्यासाठी पकोडे, कचोरी, फ्रेंच फ्राईज इत्यादी पदार्थांकडे लक्ष द्या.

कॅफिन: मुलाखतीला जाण्यापूर्वी तुम्ही आणखी एक गोष्ट टाळली पाहिजे ती म्हणजे कॅफीन. ते तुम्हाला ऊर्जा देईल, परंतु कॅफीन देखील चिंता निर्माण करू शकते या वस्तुस्थितीकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही. आणि ही अशी भावना आहे जी आपल्यापैकी बहुतेकांना अशा परिस्थितीत जाणवते. चहा किंवा कॉफी प्यायल्याने परिस्थिती आणखीनच बिघडेल आणि मुलाखतीदरम्यान तुम्हाला लक्ष केंद्रित करणे कठीण होईल. ते पूर्णपणे टाळणे चांगले आहे, परंतु तुम्हाला ते घेण्यासारखे वाटत असले तरीही, एका कपला चिकटून रहा आणि आणखी नाही.

साखरेचे पदार्थ: जास्त साखर असलेली कोणतीही गोष्ट म ुलाखतीपूर्वी टाळावी. याचे कारण असे की साखरयुक्त पदार्थांमुळे तुमच्या रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढू शकते. जेव्हा हे घडते, तेव्हा तुम्हाला मळमळ आणि थरथर वाटू शकते. केक, डोनटस, चॉकलेट आणि कँडीज यांसारखे परिष्कृत साखरेचे प्रम ाण जास्त असलेले पदार्थ खाण्याबाबत जागरूक रहा. म्हणून, साखरयुक्त पदार्थ टाळा आणि अधिक उच्च-फायबर आणि प्रथिने पर्याय निवडा. अशा प्रकारे, तुम्ही तुमच्या मुलाखतीदरम्यान अधिक लक्षपूर्वक राहू शकाल.

कार्बोनेटेड पेये केवळ कॅफीनच नाही तर तुम्ही कार्बोनेटेड पेयांपासून दूर राहणे आवश्यक आहे. या पेयांमध्ये साखरेसोबतच कार्बन डायऑक्साइडचे प्रमाणही जास्त असते. ते केवळ तुमच्या रक्तातील साखरेची पातळी वाढवत नाहीत तर अवांछित वायू आणि वेदनादायक सूज देखील होऊ शकतात. आणि ही अशी गोष्ट आहे जी तुम्हाला ती मुलाखत पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असताना अजिबात नको आहे.

## (गुरु वचन)
## ज्येष्ठांच्या अनुभवाला कमी लेखू नका

एका शेठजीकडे अपार संपत्ती होती. एकेदिवशी त्याच्या मनात विचार आला की, एक भव्य शिव मंदिर बांधावे. सहा म हिन्यात मंदिर बांधून तयार झाले. मंदिर उभारणीसाठी लागलेल्या खर्चाशिवाय जो पैसा शेठजीकडे उरला होता तो त्यांनी मंदिराच्या घुमटात भरून ठेवला.

याचा उल्लेख त्यांनी आपल्या वहीखात्यातही केला. नंतर ते तीर्थयात्रेला निघाले. मात्र वाटेतच त्यांचे निधन झाले. शेठजीचे चार मुले होती आणि चारही जण व्यापारी होते. शेठजीच्या मृत्युनंतर काही दिवसांनी त्यांच्या व्यापारात तोटा झाला. त्यामुळे त्यांना पैशाची आवश्यकता भासू लागली. तेव्हा त्यांनी आपल्या वडिलांची जुनी वहीखाते शोधण्यास सुरूवात केली. त्यापैकी एकात मंदिराच्या घुमटात धन ठेवल्याचा उल्लेख होता.

त्यात असेही लिहिले होते की, धन चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी घुमटात भरले होते. चार जणांनी घुमट तोडले. मात्र त्यांना धन मिळाले नाही. तेव्हा त्यांना आपल्या वडिलांचे घनिष्ठ मित्र असलेल्या एका ज्येष्ठ व्यक्तीला गाठले आणि घडलेला प्रकार सांगितला. त्या व्यक्तीने त्यांना चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी बारा वाजता येण्यास सांगितले. ठरलेल्या दिवशी व वेळी त्या व्यक्तीने त्या ठिकाणी खोदण्यास सुरूवात केली जिथे घुमटाची सावली पडली होती.

घुमटाची सावली चैत्र शुक्ल नवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता धन भरले होते आणि त्याच महिन्यात, दिवशी आणि वेळी घुमटाची सावली पडणाऱ्या ठिकाणी खोदकाम करण्यात आल्यावर धन सापडले. चौघा भावांनी ज्येष्ठ व्यक्तीचे आभार मानले आणि त्या धनातून आपला व्यापार पुन्हा सुरू केला. यावरून ज्येष्ठांच्या ठिकाणी असलेल्या अनुभवाला कमी लेखू नये, हेच ही कथा सांगते.

# आकाश कोसळलं, जमीन सरकली... लई अवघड हाय गड्या उमगाया बाप...

आभाळ असत वडिलांचं, भुमी आईची उबदार,
दोन्ही हरपता जीव होतो ओसाड संसार.
शांत मेघांत दडलं त्यांचं अमर प्रेम अपार,
लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रं आधार.

आई आणि वडील, हे दोन शब्द फक्त नाती नाहीत, तर आपल्या अस्तित्वाचे दोन मजबूत आधारस्तंभ आहेत. आई म्हणजे वात्सल्याची, प्रेमाची उबदार जमीन, तर वडील म्हणजे संरक्षणाचं अथांग आकाश. त्यांच्या अस्तित्वामुळेच आपलं आयुष्य स्थिर आणि सुरक्षित वाटतं. पण जेव्हा हे दोन्ही आधारस्तंभ नाहीसे होतात, तेव्हा आकाश कोसळल्याचा आणि पायाखालची जमीन सरकल्याचा अनुभव येतो. यामुळेच म्हणतात आकाश कोसळणं हे वडील गेल्यावर कळत आणि पायाखाली जमीन नाही आता कुठे निवारा शोधावा हा भाव मनात येतो जेव्हा आई नसते.'

'लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रं' हे गाणं आपल्याला याच अनुभूतीची जाणीव करून देतं. हे गाणं फक्त वडिलांच्या संघर्षाची गाथा सांगत नाही, तर त्यांच्या निधनानंतर त्यांच्या जागेची पोकळी किती मोठी आहे, हेही दाखवतं. ते गेल्यानंतर कळतं की, ज्याला आपण कधी 'घडीभर थांबून' पाहिलं नाही, त्याने आपल्यासाठी आपलं अख्खं आयुष्य समर्पित केलं होतं. हे गाणं आपल्याला त्या मुक्या प्रेमाची जाणीव करून देतं, जे डोळ्यांतून ओसंडून वाहत नाही, पण काळजाच्या कोपऱ्यात कायम वास्तव्य करतं.

काही नाती अशी असतात, ज्यांची खोली कधीही मोजता येत नाही. आईचं प्रेम सहज उमगतं, ते बोलकं असतं, ते डोळ्यांतून ओसंडून वाहतं. पण बापाचं काय? 'लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रं'... हे शब्द नुसतेच ओठांवर येतात असं नाही, तर ते थेट काळजाला भिडतात. हे गाणं ऐकताना प्रत्येक मुलाला, मुलीला आपल्या वडिलांच्या त्यागाची, त्यांच्या मुक्या प्रेमाची जाणीव होते.

वडिलांचं प्रेम हे काळ्या मेघांसारखं असतं. वरून दिसायला शांत, गंभीर; पण आतून ते पावसासारखं भरलेलं असतं. ते कधीही 'मी तुझ्यासाठी काय केलं' असं बोलून दाखवत नाहीत. ते फक्त 'झिजू-झिजू संसाराचा गाडा' हाकत राहतात. त्यांच्या ओठांवर भलेही हसू असेल, पण त्यांच्या शरीराचा कणकण आपल्या कुटुंबासाठी वाकलेला असतो.

हे गाणं आपल्याला एका क्षणासाठी थांबायला सांगतं. 'घडीभर तू थांब जरा क त्याची धाप रं'. ही धाप म्हणजे त्यांच्या अथक परिश्रमाचा आणि निस्वार्थ त्यागाचा आवाज. हा आवाज ऐकण्यासाठी कान नाही, तर संवेदनशील मन लागतं.

'आधाराचा वड जणू वाकलं आभाळ' – हे रूपक किती समर्पक आहे! आपल्या कुटुंबासाठी ते एखाद्या विशाल वडाच्या झाडासारखे उभे राहतात, भलेही त्यासाठी त्यांना स्वतःला वाकावं लागलं तरी. आपल्या पायावर उभं राहण्यासाठी ते आपला अख्खा जन्म उधळून टाकतात. त्यांच्या शिवाय आपलं आयुष्य रानोमाळ पाचोळ्यासारखं विखुरलेलं असतं, ज्याला कोणतीच दिशा नसते.

वडिलांचं प्रेम शब्दांत व्यक्त होत नाही. ते त्यांच्या कृतीत दडलेलं असतं. ते दूर असले तरी त्यांची चिंता आपल्यावर मुक्कामाला असते. आपल्यासाठी राबताना त्यांच्या डोळ्यात एक वेगळीच चमक असते, कारण आपलं सुख हीच त्यांची सर्वात मोठी खुशी असते.

हे गाणे केवळ एक गाणे नाही, तर एक अनुभव आहे. हे वडिलांच्या अंतर्मनाचा प्रवास आहे. आईचं प्रेम जसं चंद्रासारखं शांत आणि शीतल असतं, तसंच वडिलांचं प्रेम सूर्यासारखं तेजस्वी आणि ऊर्जा देणारं असतं.

आजच्या वेगवान जगात, जिथे नात्यांची गुंतागुंत वाढत आहे, तिथे हे गाणं आपल्याला आपल्या मुळांची आठवण करून देतं. हे आपल्याला शिकवते की, ज्या व्यक्तीने आपल्यासाठी आपलं आयुष्य समर्पित केलं आहे, त्या व्यक्तीला समजून घेणं हेच खरं प्रेम आहे. 'लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रं', पण ज्याला एकदा ते उमगलं, त्याला आयुष्यात कोणत्याही आधाराची गरज भासत नाही.

गीत : लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रं
उरामंदीं माया त्याच्या काळ्या मेघावानी
दाखविना कधी कुना डोळ्यातलं पाणी
झिजू झिजू संसाराचा गाडा हाकला
व्हटामंदी हासू जरी कना वाकला
घडीभर तू थांब जरा क त्याची धाप रं
लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रं ।।
मुकी मुकी माया त्याची मुकी घालमेल
लेकराच्या पायी उभा जल्म उधळेल
आधाराचा वड जणू वाकलं आभाळ
तेच्याइना पाचोळा जीनं रानोमाळ ।।१।।
किती जरी लावलं तू आभाळाला हात
चिंता तुझी मुक्कामाला तेच्या काळजात
वाच तेच्या डोळ्यातली कधी कासाविशी
तुझ्या पायी राबनं बी हाये त्याची ख़ुशी ।।२।।

गीत रचना : गुरू ठाकूर मुळ गायक: अजय गोगावले
चित्रपट: बापल्योक

# भारत विश्र्व शांतीचे उगमस्थान व आधारस्तंभ

जगात शांतता प्रस्थापित रहावी या उद्देशाने १९८१ पासुन संयुक्त राष्ट्र महासभेने २१ सप्टेंबर विश्र्व शांती दिवस साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हा पासून जगात विश्र्व शांती दिवस साजरा करण्यात येतो.जगात भारताला शांतीचे प्रतीक मानल्या जाते.विश्र्वशांतीची सुरूवात भारतानेच केली आणि पुढेही विश्र्व शांतीची जोत भारताकडून अशीच प्रज्वलित होत राहील हे आपल्याला जी-२० शिखर परिषदेवरून लक्षात येते.आज जगात शांती कशी प्रस्थापीत करता येईल याकडे भारताचे संपूर्ण लक्ष आहे. भारत हा देवी-देवता, ऋषि-मुनी, साधु-संत,ज्ञानी, थोर महात्म्ये, क्रांतिकारक,जहालवादी- मवाळवादी अशा अनेक विचारवंतांच्या प्रयत्नाने बनलेला जगाच्या पाठीवरील एकमेव देश भारत आहे. त्यामुळे जगात शांतता कशी प्रस्थापीत करता येईल याचा अभ्यास करण्याकरिता संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे नेहमीच असते. कारण जगाच्या पाठीवर भारताचा उगम शांतता प्रस्थापित करण्यासाठीच झाला असावा.त्यामुळे गंगा,कावेरी, गोदावरी, नर्मदा, यमुना, वैनगंगा,तापी, कृष्णा इत्यादी नद्या सुध्दा शांतीचे द्योतक मानले जाते.भारताने नेहमी शांततेचा पुरस्कार केला आहे आणि करीत राहिल.गौतम बुध्दासारख्या महाज्ञानी यांनी भारतात शांतीची जोत प्रज्वलीत केली व संपूर्ण जगभर फीरवीली.मर्यादा पुरूषोत्तम राम यांनी सुध्दा शांततेचा पाठ संपूर्ण जगाला शिकवणीला व इस्लामिक धर्मगुरू महम्मद पैगंबर यांनी सुध्दा विश्र्व शांती करीता मोठे अभियान छेडले होते त्याचप्रमाणे शिख गुरू गुरूनानक देवजी यांनीही शांती प्रस्थापित करण्यासाठी मोलाची कामगिरी केली.पुर्वी आणि आताही विश्र्वात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर होता आणि आहे.यात तिळमात्र शंका नाही.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले असुन जगातील अनेक देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे जगात तिसऱ्या महायुद्धाची आहाटनिर्माण केली आहे. जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत संपूर्ण ताकद लावीत आहे तर चीन नेहमीच शांती भंग करण्याच्या तयारीत असतो. परंतु भारताचे काम शांततेने होत नसेल तर भारतही उग्ररूप धारण करून चीनला पटकनी देवु शकते.मानवाचा जन्म शांतता प्रस्थापित करण्यासाठी व जिवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी झाला आहे.परंतु चीन कुत्रे, मांजर, चामगाधड, पाल,साप,जे भेटेल ते खातात त्यामुळे आज चीनची बुध्दी कुत्र्यासारखी झाली आहे.त्यामुळे चीनने जर शांती भंग केली तर कुत्ते की मौत मारा जायेगा ही बाब चीनने लक्षात ठेवली पाहिजे.कारण वेळ पडल्यास तैवान चीनला सूध्दा भारी पडु शकतो. जगात आतंकवाद दिवसेंदिवस वाढत होता यामुळे जगातील संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण होवून शांती भंग होत होती.शेवटी संपूर्ण जगाला शपथ घ्यावी लागली की जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आतंकवाद्यांचा खात्मा होणे गरजेचे आहे. त्या पध्दतीने प्रत्येक देशांनी आतंकवाद्यांविरूध्द कारवाईला सुरुवात केली.कारण प्रत्येक देश आतंकवाद्यांच्या कारवाईने त्रस्त होते आणि आहे.परंतु संपूर्ण विश्र्वाला वाटायला लागले की आतंकवाद्यांचा नायनाट केल्याशिवाय जगात शांतता प्रस्थापित होवुच शकत नाही. त्या अनुषंगाने आज प्रत्येक देश शांततेसाठी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास दृढ संकल्प असल्याचे दिसून येते. सध्याच्या परीस्थितीत चिनच्या विस्तारवादी नितीमुळे विश्र्व शांती भंग होण्याच्या मार्गावर आहे.चीन-तैवान संघर्ष लक्षात घेता चायना सी मध्ये चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेसह नाटो सेना सज्ज झाली आहे त्याचबरोबर जापान व ऑस्ट्रेलियाने सूध्दा कंबर कसली आहे. म्हणजेच सध्याच्या परिस्थितीत जगातील शांती भंग करण्याचे काम चीन करीत आहे.याचे प्रायचीत्य संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते.जगात शांती प्रस्थापित व्हायची असेल तर चीनला त्याची जागा दाखवावीच लागेल.चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जगात अशांतीचे वातावरणनिर्माण झाले आहे.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी अनेक धर्माचे,जातीचे,पंथाचे व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात. भारताने नेहमीच शांतीचा पुरस्कार केला आहे.परंतु भारताशेजारी गद्दारांची फौज उभी ठाकली आहे. एकीकडे पाकिस्तानचा आतंकवाद, बांग्लादेशचा जातीयवाद, म्यानमारची घुसखोरी, नेपाळमध्ये गृहयुद्ध व चीनची विस्तारवादी नीती यामुळे भारताने सुध्दा जशास तसे उत्तर देण्याचे ठाणले आहे.भारत नेहमी शेजारी राष्ट्रांसोबत शांती प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असतो. परंतु भारताचा जीवलग मित्र समजल्या जाणाऱ्या नेपाळनेसुध्दा चीनचे पाय चाटण्याचे काम करीत असतो व भारताच्या पाठीत खंजर खुपसण्याचे काम करतो हे आपण मागे पहाले.अशाप्रकारे भारता शेजारचे संपूर्ण राष्ट्रांना चीन आर्थिक मदत करून आपला कब्जा करून सैन्य सामुग्री व एअरबेस तयार करण्याच्या तयारीत आहे. आज विश्र्व शांति टिकवून ठेवण्यासाठी अती लोकसंख्या असलेल्या देशांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या बाबतीत चीन नंतर भारताचा नंबर लागतो.परंतु भारताच्या भुभागाचा विचार केला तर जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून येते.त्यामुळे भारताला शांती प्रस्थापित करण्याकरिता एक पाऊल पुढे टाकूनहम दो हमारा एकही मोहीम राबवुन लोकसंख्या नियंत्रणात आणाली पाहिजे. युध्द सामुग्रीच्या चढाओढीमुळे प्रत्येक देश अनेक द्वीधेमध्ये असल्याचे दिसून येते.या द्वीधेपासुन मुक्ती मिळवायची असेल तर प्रत्येक देशांनी अणुचाचण्या, घातक हतीयार, मिसाईल परीक्षण, अणुबॉब इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.तेव्हाच विश्र्वात शांती प्रस्थापित होवु शकते.आज संपूर्ण जगाला ग्यात आहे की विश्र्वामध्ये शांति प्रस्थापित करायची असेल तर भारताचा सहयोग अती आवश्यक आहे.आज युक्रेन-रशिया व हमास-इजरायल संघर्ष,इरिण-इझरायल संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी अग्रेसर आहे.विश्र्वशांतीच्या बाबतीत भारत काय आहे हे विश्र्वाला महात्मा गांधींनी दाखवून दिले आणि आज १४० कोटी भारतीयांच्या छत्रछायेच्या माध्यमातून भारत विश्र्व शांतीचा मसिहा बनल्याचे दिसून येते.कारण प्रत्येक देशाला शांतीची गरज आहे. जगाच्या पाठीवर भारताने अनेक उतार-चढाव पाहीले आहेत.यातुनच शांतीचा उगम झाल्याचे दिसून येते. भारताची संस्कृतीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे.त्रेतायुग,व्दापरयुग,सत्ययुग आणि कलयुगात सुध्दा भारतीय संस्कृतीने संपूर्ण जगाला शांततेची शिकवण दिली आहे.भारत भुमित महाभारत, रामायण इत्यादी ज्या घटना घडल्या त्या सर्व विश्र्व शांती करीता होत्या ही बाब संपूर्ण जगाने लक्षात ठेवली पाहिजे.भारतातुन जगात जो ही संदेश जातो तो विश्र्व शांती करीता असतो.भारताने पाकिस्तानला शांततेसाठी हजारो वेळा समजविले.परंतु त्यांच्या नसानसात व रक्तात क्रुरता स्पष्ट दीसुन आली. त्यामुळेच पाकिस्तानात आतंवाद उफाळलेला आहे व तो स्वतः रक्ताच्या लाथोळ्यात अडकल्याचे दिसून येते. त्यामुळेच पाकिस्तानपासुन इस्लामीक देशांसह इतर देश अलग-थलग पडल्याचे दिसून येते.विश्र्व शांती म्हणजे मानसिक सुख नसुन वन्यप्राणी, जीव-जंतु,जंगल संपदा, निसर्गाचे संतुलन, पृथ्वीचे संरक्षण या संपूर्ण बाबींवर योग्य नियंत्रण ठेवुन त्यांची जोपासना केली तर विश्र्वामध्ये आपोआप शांती नांदायला सुरूवात होईल. विश्र्व हेची माझे घरही भुमिका जगातील प्रत्येक देशांनी व व्यक्तीने जोपासली पाहिजे.आज संपूर्ण जग प्रदुषणामुळे, अनेक आजारामुळे,युध्दजन्य परीस्थितीमुळे जगातील प्रत्येक व्यक्ती त्रस्त आहे.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे.विश्र्वामध्ये शांती प्रस्थापित करण्यामागे भारताचा सर्वधर्मसमभाव हा मुलमंत्र सार्थक ठरत आहे.कारण भारतात हिंदू, मुस्लिम, शिख,ईसाई, बौद्ध, फारसी,ख्रिश्र्चन इत्यादी अनेक धर्मांचा व देवी-देवतांचा वास नेहमी नांदत असतो.त्यामुळे विश्र्व शांतीच्या गंगेचा उगम भारतातुन झाल्याचे दिसून येते.या लेखाच्या माध्यमातून मी हेच सांगु इच्छितो की २१ सप्टेंबरला जगातील प्रत्येक व्यक्तीने शांतता प्रस्थापिकरण्यासाठी संकल्प करावा.जगातील देशांना मी आग्रह करेल की विस्तारवादीनीतीचा खात्मा करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.कारण विस्तारवादी नीती संपूर्ण जगाला घातक आहे.जगात भारताला विश्र्वशांतीचे उगमस्थान, दुत, आधारस्तंभ अशा अनेक उपमा दिल्या आहेत.याची जानीव चीनने सुध्दा ठेवली पाहिजे.करोना काळापासून संपूर्ण जग नमस्कार करायला लागले आहे हे सुद्धा भारतीय संस्कृतीचे शांतीचे प्रतीक आहे.सध्याच्या परिस्थितीत गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध,हमास-इजरायल युद्ध आणि चीन-तैवानचा वाढता संघर्ष टोकाला पोहोचले आहे याला शांत करण्यासाठी भारत अग्रेसर आहे हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. जगाला यशाकडे वाटचाल करायची असेल तर शांतीचा मार्गअवलंबावाच लागेल मग तो कोणताही देश असो.२१ सप्टेंबर विश्र्व शांतीदिवस लक्षात घेता जगातील प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी वृक्षारोपण करून शांतीचा संदेश संपूर्ण जगाला दिला पाहिजे.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार ) मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

## साप्ताहिक राशिभविष्य, दि. २१ सप्टेंबर २०२५ ते २७ सप्टेंबर २०२५

...........................................

मेष : एखाद्या सहज वाटणाऱ्या कामातसुद्धा तुम्हाला युक्तीचा अवलंब करावा लागेल. आपला मतलब साध्य करण्याकरिता व्यावसायिक लोकांना इतरांच्या कलाने वागावे लागेल. येणी वसूल करा. नोकरीमध्ये वरिष्ठ जादा जबाबदारी तुमच्यावर सोपवतील. एखादे कर्ज-प्रकरण मंजूर होईल. स्वत:च्या आणि कुटुंबीयांच्या स्वास्थ्याची काळजी घ्यावी लागेल. विद्यार्थ्यांनी अभ्यासामध्ये थोडीफार मधेमधे विश्रांती घ्यावी.

वृषभ : तुमच्या पथ्यावर पडतील असे बदल घडल्याने तुम च्यातील निराशा कमी होऊन आशावाद वाढेल. धंद्यामध्ये जे प्रयत्न कराल त्यात यश लाभेल. पैशाचे प्रमाण वाढेल. शेअर्स अथवा तशाच प्रकारची केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. नोकरीमध्ये मिळालेल्या सुविधा आणि सवलतीमुळे तुमच्या कामाचा दर्जा सुधारेल. घरामधील मतभेदामध्ये समेट घडेल. इस्टेट, जागा या व्यवहारांमध्ये तुमच्या मनाप्रमाणे प्रगती होईल. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

मिथुन : तुमच्या मनासारख्या घटना घडल्यामुळे सर्व आघाड्यांवर तुम्ही आशावादी बनाल. पूर्वीची निराशा जाऊन जीवनात नवे रंग भरावेसे वाटतील. व्यापारउद्योगात आर्थिकदृष्ट्या चांगले बदल होतील. गुंतागुंतीची कामे सहज होतील. नोकरीमध्ये प्रतिष्ठा वाढवणारे काम मिळेल. परदेशी जाऊ इच्छिणाऱ्यांना योग्य दिशा मिळेल. घरामध्ये सहजीवनाचा आनंद घ्याल. विद्यार्थ्यांना यशाची खात्री वाटेल. त्यांनी अवघड विषयांचा प्रथम अभ्यास करावा.

कर्क : तुम्ही फारसे बोलला नाहीत तरी तुमची निरीक्षणशक्ती तुमच्या बरोबर उपयोगी पडेल. व्यापारातील अंदाज अचूक ठरल्याने फायद्याचे प्रमाण वाढेल. नवीन योजना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी योग्य माणसांची जुळवाजुळव होईल. कर्जप्रकरणात यश लाभेल. नोकरीमध्ये तुमच्या करियरच्या दृष्टीने चांगली घटना घडेल. घरामध्ये आनंददायी सोहळा ठरेल. प्रवासाचे बेत ठरतील. विद्यार्थ्यांचे अभ्यासातील शंकानिरसन होईल.

सिंह : उत्साहवर्धक घटना आपसुकच घडल्यामुळे तुमच्या मनावरचे ओझे उतरेल. व्यापारीवर्गाला कामाचे नियोजन आणि केलेल्या कृतीचा फायदा मिळेल. पैशाची अडचण असली तरी त्यावर तुम्ही तुमच्या हिकमतीने मार्ग काढाल. नवीन नोकरीचा शोध संपुष्टात येईल. घरातील महत्त्वाच्या निर्णयात तुम्ही सक्रीय सहभाग घ्याल. प्रकृतीच्या तक्रारी कमी होतील.

कन्या : ज्या गोष्टीमध्ये निर्णयाची आतुरतेने वाट पाहात होता त्यात मनाजोगती बातमी कळेल. तुमच्या महत्त्वाकांक्षी योजना साकार होण्यास भरपूर वाव असेल. व्यवसायउद्योगाम ध्ये ओळखींचा फायदा घेऊन नवीन प्रकल्पांचा श्रीगणेशा होईल. नोकरीमध्ये निसटलेल्या संधी पुन्हा दृष्टिक्षेपात येतील. उच्चशिक्षणासाठी नवीन योजना राबवाल. घरामध्ये मेळावा, आप्तेष्ट नातेवाईक यांचा पाहुणचार यात वेळ छान जाईल. विद्यार्थ्यांना यशाची खात्री वाटेल.

तूळ : आजूबाजूच्या वातावरणात जरी विरोध असला तरी तुमचे नैतिक धैर्य चांगले असेल. व्यापारातील महत्त्वाच्या कामांना योग्य ती दिशा मिळेल. आवश्यक ती पैशाची कुमकही उपलब्ध होईल. खर्चांना आळा घालण्याकरिता उपाययोजना अमलात आणाल. नोकरीमध्ये आवडीचे काम तुमच्या वाट्याला येईल. परदेशी जाण्याचे बेत ठरतील. विवाहासंबंधी अडचणी दूर होतील. कलाकार खेळाडूंना नवीन संधी मिळेल. विद्यार्थ्यांना यशदायक सप्ताह आहे.

वृश्चिक : गेल्या एकदीड महिन्यात सहन करावी लागलेली कामातील गैरसोय आणि विलंब यातून मार्ग काढण्यासाठी निश्चित उपाय योजाल. व्यावसायिकांनी अनुकूल ग्रहमानाचा फायदा उठवावा. ज्येष्ठ किंवा बुजूर्ग व्यक्तीला भेटणे, त्यांना तुमच्या अडचणी सांगणे, या गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरीमध्ये स्वयंपूर्ण राहा. ज्येष्ठ व्यक्तीच्या तब्येतीत सुधारणा झाल्याने तुम्हाला हायसे वाटेल. विद्यार्थ्यांना अभ्यासाला मनासारखे वातावरण लाभेल.

धनू : कामापुढे तुम्ही कष्टाची पर्वा करत नाही. या सप्ताहात मात्र प्रकृतीचा विचार करून तुमचे कार्यक्रम आखा. महत्त्वाच्या कामात जर विलंब झाला तर पर्यायी व्यवस्था आधीच करून ठेवा. व्यापारउद्योगातील मिळणारे पैसे धंद्यातीलच निकडीच्या कामाकरता खर्च करावे लागतील. नोकरीमध्ये वरिष्ठ तुम्हाला कामाच्या संलग्न सुविधा मंजूर करतील. घरामध्ये तुमचा आडम ुठा स्वभाव इतरांच्या रोषाला कारणीभूत होईल. विद्यार्थ्यांनी स्वत:चा तणाव वाढवू नये.

मकर : समयसूचकतेने घेतलेले निर्णय तुमचे यश द्विगुणित करील. जनसंपर्काअभावी रखडलेली कामे वेग घेतील. व्यवसाय-धंद्यात महत्त्वाच्या कामांकरिता प्रवास करावा लागेल. परदेश व्यवहारांना चालना मिळेल. नोकरीमध्ये मात्र तुमच्याकडून वरिष्ठांच्या अपेक्षा वाढल्याने नेहमीपेक्षा जास्त काम करावे लागेल. घरामध्ये शुभसमारंभ ठरेल. लेखक, वृत्तपत्रकार यांना संधीचा फायदा घेता येईल. विद्यार्थ्यांना त्यांची अंत:स्फ ूर्ती उपयोगी पडेल.

कुंभ : तुमची योग्य वेळी केलेली कृती तुमचे यश वाढवायला उपयोगी पडेल. धंदा-व्यवसायातील आर्थिक स्थिती मनाप्रमाणे राहील. पैशाचा विविध मार्गाने ओघ चालू राहिल्याने नवीन म शिनरी-साधने यांची खरेदी होईल. गरजेपुरते बँक अथवा वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळू शकेल. नोकरीमध्ये तुमच्या प्रगतीच्या दृष्टीने लाभदायक जागेवर नेमणूक होईल. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या प्रकृतीकडे लक्ष द्यावे.

मीन : व्यापार-उद्योगात तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडू लागतील. बाजारातील चढउतार तुम्हाला तुमची पैशाची बाजू सुधारायला उपयोगी पडतील. नोकरीमध्ये तुम्हाला हवी असलेली सवलत वरिष्ठ द्यायला तयार होतील. घरामध्ये काही सुधारणा करण्याचे बेत पक्के (नक्कीप होतील. सहजीवनाचा आनंद घ्याल. विद्यार्थ्यांनी योग्य वातावरणाचा जास्त अभ्यासाकरिता उपयोग करून घ्यावा.

# त्यांच्या वाणीतून....

केंद्रीय मंत्री ऽअीहुळपळतरळीहपरु लिहितात की, रस्त्यावरील साम ान्य विक्रेता ते कॉर्पोरेट विश्वात कार्यरत अधिकारी अशा प्रत्येकाला सक्षम करत तंत्रज्ञान हा भारताचा सर्वात मोठा समतोल साधणारा घटक ठरला आहे. इंडिया स्टॅक, युपीआय, जेएएम त्रिसूत्री आणि कोविन , नवोन्मेष तसेच समावेशन यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून लोकांच्या जीवनात परिवर्तन घडून आले आहे, प्रशासनात सुधारणा झाली आहे आणि जागतिक व्यासपीठावर भारताची भूमिका अधिक बळकट झाली आहे.

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

देशात सर्वात जास्त परकीय गुंतवणूक खेचून आणणारे आपले राज्य आहे. कमी कालावधीत या गुंतवणुकीचे उद्योगात रूपांतर करण्यासाठी सुधारणा करण्यात येत आहेत. नवीन उद्योग उभारणीसाठी लागणारे परवाने कमी करून वेळेची बचत करावी.

**- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894